क्रमांक :पोअय/ वि.चौ./कक्ष १२(१)/अं.आ/पोहेका ५९५/ 8019 /२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 29 OCT 2020

## अंतीम आदेश

**संदर्भ -** का.दा.नो.क्र.वाचक/कादानो/पोहेका ५९५/ २०२०/६८४ यवतमाळ दि.१६/४/२०२०

**कसूरदाराचे नाव -** **पोहेका / ५९५ भालचंद्र मांडवकर नेमणुक- पो.स्टे. मारेगाव**

**थोडक्यात कसूरी :-** **कर्तव्यात अत्यंत हलगर्जीपणा,निष्काळजीपणा,बेपर्वावृत्ती की,ज्यात तुम्ही खालील प्रमाणे कसुरी केली आहे.**

---oo---

**तुम्ही पोहेका / ५९५ भालचंद्र मांडवकर नेमणुक- पो.स्टे. मारेगाव येथे कार्यरत असुन तुम्ही खालीलप्रमाणे कसुरी केल्याचे दिसुन येते.**

----ooo---

तुम्ही पो.स्टे.मारेगाव येथे नेमणुकीस असुन पो.स्टे.मारेगाव येथील अप.क्र.२९४/१९ मधील अटक आरोपी मंगेश बनकर रा.वरोरा जि.चंद्रपुर यास न्यायालयात हजर करण्याअगोदर आरोपी यांचेकडील जमा असलेली ४५००/- रुपयाची रक्कम स्वता:जवळ घेवुन आरोपीस कोणतीही पावती दिली नाही.

तुम्ही आरोपीचे अंगझडतीत मिळुन आलेले ४५०० रु.त्याचे नातेवाईकांना देवुन त्याबाबत स्टेशन डायरीला नोंद घेणे आवश्यक होते. किंवा सदरची रक्कम पो.स्टे.ला जमा करुन तशी पावती आरोपीस देणे हे तुमचे कर्तव्य असतांना सुध्दा तुम्ही सदरची रक्कम स्वत:जवळ ठेवुन घेतली. त्यामुळे आरोपी यांचे नातेवाईकांनी वि. न्यायालयात याबाबत तक्रार केली होती.

सदर बाब ही न्यायाधिश साहेब यांनी प्रभारी अधिकारी यांना भेटी दरम्यान निर्दशनास आणुन दिली होती .तत्पुर्वी कोर्ट मोहरर पोका/९८२ प्रमोद फुपरे यांनी त्याच दिवशी प्रभारी अधिकारी यांना कळविले वरुन प्रभारी अधिकारी यांनी तुम्हास वेळीच कळवुन आरोपी यांची रक्कम परत करण्याबाबत कळविले असता आरोपी जामीनावर सुटल्यानंतर स्वत:जवळची जमा रक्कम तुम्ही त्यास परत केली.

सदर रक्कम हेतुपुरस्पर स्वत:चे फायद्याकरीता जवळ बाळगुन कर्तव्यात कसुर केला आहे.तुमचे गैरशिस्त वर्तनामुळे जनमानसात पोलीसांची प्रतीमा मलीन झाली आहे.

अशा प्रकारे तुमचे हे कृत्य पोलीस खात्यास अशोभनिय व अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहे.यावरुन तुम्ही बेजबाबदारपणा,गैरशिस्त वर्तनाचे, पोलीस खात्याची विश्वासर्हतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी,तसेच आक्षेपार्ह करीत असल्याचे निदर्शनास येते.त्यामुळे जनसामान्यामध्ये पोलीस दलाची बदनामी झाली.शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात